**प्रेस नोट**

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे रविंद्र हिम्मतराव भंडारे, वय ५४ वर्ष, कनिष्ठ सहायक, वर्ग –३, समाज कल्याण विभाग, पंचायत समिती चिखली, रा. गांधीनगर चिखली |
| लाच मागणी | ११,०००/– रुपये |
| लाच स्विकारले | लाचेचा पहिला हप्ता ६,०००/– रुपये |
| घटनास्थळ | समाज कल्याण विभाग पंचायत समिती चिखली |
| घटना तारीख | दि.१४.०३.२०२४ |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांनी दिनांक १४.०३.२०२४ रोजी लाप्रवि बुलढाणा घटकाकडे तक्रार दिली की, तक्रारदार यांचे कुटुंबियांचे नांवे इलेक्ट्रीक पंप, एचडीपीई स्प्रिंकलर पाईप, शिलाई मशीन मिळण्याकरिता समाज कल्याण विभाग चिखली पंचायत समिती अंतर्गत कागदपत्र सादर केली असता त्यासंदर्भाने भंडारे लिपीक चिखली पंचायत समिती यांची भेट घेतली असता त्यांनी सर्व साहित्य मंजुर करुन देण्यासाठी १२,०००/– रुपये लाचेची मागणी करुन यातील १,०००/– रुपये १५ दिवसांपुर्वी तक्रारदार यांचेकडुन स्विकारले. यानंतर श्री भंडारे हे ऊर्वरीत ११,०००/– रुपये लाचेची रक्कम मागणी करीत असल्याबाबतची तक्रार आज रोजी प्राप्त झाली.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १४.०३.२०२४ रोजी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक श्री.रविंद्र हिम्मतराव भंडारे यांनी समाज कल्याण विभाग चिखली पंचायत समिती अंतर्गत तक्रारदार यांचे कुटुंबियांना मिळणार असलेले इलेक्ट्रीक पंप, एचडीपीई स्प्रिंकलर पाईप, शिलाई मशीन मिळवुन देण्याकरिता ११,०००/– रुपये लाचेची मागणी करुन यातील लाचेचा पाहिला हप्ता ६,०००/– रुपये आज रोजी स्विकारण्यास व ऊर्वरीत ५,०००/– रुपये नंतर स्विकारण्यास संमती दिली. त्यावरुन सापळा कार्यवाही दरम्यान लाचेचा पहिला हप्ता ६,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारतांना समाज कल्याण विभाग पंचायत समिती चिखली येथे आरोपी लोकसेवक रविंद्र हिम्मतराव भंडारे, वय ५४ वर्ष, कनिष्ठ सहायक, वर्ग –३, समाज कल्याण विभाग, पंचायत समिती चिखली, रा. गांधीनगर चिखली यांना रंगेहात पकडण्यात आले वरुन त्यांचे विरुध्द चिखली जि.बुलढाणा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

मार्गदर्शन :– १. मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अनिल पवार, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

पर्यवेक्षण अधिकारी – श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि बुलढाणा

कार्यवाही पथक /तपास अधिकारी – श्री महेश भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि.बुलढाणा

एएसआय शाम भांगे, पोहेकॉ विलास साखरे, प्रविण बैरागी, रविंद्र दळवी, पोकॉ गौरव खत्री, चापोकॉ. शेख अरशद यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो * बुलढाणा * सत्यमेव जयते

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा